संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# दलालांच्या तावडीत आयपीएल हे सिध्द झाले

**आयपीएलमध्ये** शंभर टक्के सट्टेबाजार झाला किंवा होतो, हे न्यायाधीश लोढा समितीच्या निष्कर्षावरून सिध्द होते. बीसीसीआयचे माजी अध्यक्ष श्रीनिवासन यांचा जावई गुरुनाथ मयप्पन याचा चेन्नई सुपर किंग तर राज कुंद्रा याचा राजस्थान रॉयल संघ आयपीएलमध्ये सट्टेबाजीचा धुमाकूळ घालत होता. हेही यानिमित्ताने उघड झाले. पैशाच्या जोरावर आणि बीसीसीआयमधल्या वशिलेबाजीचा उपयोग करून पैसा कमावण्याचा नवा फंडा आयपीएलच्या निमित्ताने शोधून काढला गेला.आणि खरे सांगायचे तर एकेकाळी अतिशय मनस्वी आनंद देणाऱ्या क्रिकेट खेळाला कायमचे ग्रहण लावले गेले.जर सुरुवातीलाच आयपीएल सामन्यांच्या कार्यपध्दतीचा नीट अभ्यास झाला असता आणि त्याच्यावर नियंत्रण ठेवणारी भक्कम व्यवस्था उभी केली असती, तर अशा मस्तीखोर दलालांना संधी मिळाली नसती. आणि क्रिकेटचा बाजार मांडून सट्टाही खेळला गेला नसता.लोढा समितीने या दोघांच्याही दोन्ही संघांना दोन वर्षे बंदी घातली आहे. आणि यांच्या मालकांना आजीवन बंदीचा आदेश दिला आहे. पण मुद्दा असा निर्माण होतो की, दोन वर्षांनंतर दुसऱ्याच्या नावाने हेच दोन्ही संघ पुन्हा क्रिकेटच्या मैदानात उतरतील आणि सट्ट्याची चटक लागलेले हे दोन्ही मालक पडद्यामागून आपला हेतू साध्य करतील. आणि म्हणूनच केवळ आजीवन बंदी, दोन वर्षांची हद्दपारी एवढ्यावर काम भागत नाही. उलट लोढा समितीच्या निष्कर्षाचे निमित्त साधून सगळ्या आयपीएल सामन्यांच्या कार्यपध्दतीचा किंवा व्यवस्थेचा पुनर्विचार झाला पाहिजे. कारण या सामन्यांमधून पैसा कमावणे आणि तो कमवित असताना कोणतीही भीडभाड न ठेवणे असा बेजबाबदारपणा केला जातो. वाटेल त्या मार्गाने आणि वाटेल तो धांगडधिंगा घालून पैसा ओरबाडण्याचे हे माध्यम होत चालले आहे. क्रिकेटच्या लोकप्रियतेचा लिलाव मांडून आपली दुकानदारी करणाऱ्या या संघांना लगाम घातला पाहिजे. त्यांनी क्रिकेटच्या नावाने व्यवसाय करायला हरकत नाही, परंतु व्यवसायाचीसुध्दा काही नीतिमूल्ये असतात, काही नियम असतात ती पाळली गेली पाहिजेत. माझा व्यवसाय आहे आणि तो माझ्या पध्दतीने वाटेल तेव्हा कसाही केव्हाही करेन, अशी वृत्ती तयार होणे धोकादायक म्हटले पाहिजे. आणि आज नेमकी तीच परिस्थिती पहायला मिळते. क्रिकेट खेळाचे इतके वाटोळे झाले आहे की, त्याच्याशी संबंध नसलेल्या दलालांच्या तावडीत हा खेळ सापडला आहे. त्यामध्ये राजकारणातल्या नेत्यांपासून ते चित्रपटातल्या अभिनेत्यांपर्यंत अनेकांनी क्रिकेटला दावणीला बांधले आहे.

## टेनिस आणि क्रिकेट

आज एकूणच क्रिकेट खेळाविषयी चिंताजनक परिस्थिती पहायला मिळते. एकेकाळी अतिशय निर्भेळ आनंद देणारा लहानांपासून वृध्दांपर्यंत सर्वांना सामावून घेणारा क्रिकेट हा खेळ पैसा कमावण्याचा खेळ झाला आहे. खेळ कसा खेळावा, त्यामध्ये अधिकाधिक सभ्यता कशी असावी. खेळाडू आणि प्रेक्षक या दोघांनाही सारख्याच आनंदाचे वाटेकरी कसे होता येते, याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून नुकत्याच संपलेल्या विंबल्डन टेनिस स्पर्धेचे देता येते. खरे तर क्रिकेटपेक्षाही ज्यादा पैसे या खेळातून कमावले जातात. आयोजकांना तर पैशाची कमाई होतेच.परंतु आज जोकोविचसारखा खेळाडू जगातला दुसऱ्या क्रमांकाचा श्रीमंत खेळाडू म्हणून गणला जातो. यावरून त्या खेळाचा दर्जा कसा वैशिष्ट्यपूर्ण टिकवून ठेवला गेला आहे, हे लक्षात येते. प्रचंड पैसा असूनही टेनिस स्पर्धेचा अजिबात बाजार झालेला नाही. प्रेक्षकसुध्दा इतक्या समजूतदारपणे वागत असतात की, त्यातून त्यांना मनमुराद आनंद लुटता येतो. याच्या उलट परिस्थिती क्रिकेटची झाली आहे. या खेळाला प्रचंड लोकप्रियता आहे आणि त्यामधून प्रचंड पैसा कमावता येतो, हे लक्षात घेऊन त्याचा बाजार मांडला गेला. दोन्ही खेळांमधला हा फरक प्रकर्षाने नजरेत भरल्याशिवाय राहात नाही. पैशासाठी खेळाचा बळी देण्याचा उद्योग आयपीएल प्रकरणाने केला. तर खेळासाठी किंवा त्यातल्या आनंदासाठी पैशाचे मूल्य जपण्याचे काम टेनिससारख्या स्पर्धेतून झाले. हा फरक जरी क्रिकेटमधल्या दिग्गजांनी जरी घेतला तरी, आपण क्रिकेटची प्रतिष्ठा टिकवून ठेवण्यासाठी काय केले पाहिजे याची जाणीव होऊ शकेल. मय्यप्पन किंवा कुंद्रा हे अतिलोभामुळे सट्ट्याच्या कचाट्यात सापडले. आणि त्यांनी स्वतःचा बट्ट्याबोळ करून घेतला. परंतु त्यांच्यासारखेच न बोलता सट्टेबाजीचा आधार घेणारे इतरही संघमालक आहेत. त्यांच्या छुप्या कारवाया तशाच चालू राहतील. त्यालादेखील लगाम घालणारी आणि आयपीएल सामन्यांची पारदर्शक व्यवस्था निर्माण करणारी यंत्रणा सरकारने आणि बीसीसीआयने तातडीने निर्माण केली पाहिजे. तरच या लोढा समितीच्या निष्कर्षाचा मुलगामी उपयोग केला गेला, असे म्हणता येईल.

## नेते आणि अभिनेत्यांचा धुमाकूळ

दुर्दैवाची गोष्ट अशी की हा सट्टेबाजार करत असताना खेळाडूंचा जो घोडेबाजार भरवला जातो तो आणखीनच क्लेषकारक म्हणावा लागेल. खरे तर त्या सट्टेबाजाराचाच तो एक भाग म्हणायला हवा. कारण अशा भरमसाठ किमती देऊन खेळाडूंची खरेदी होते. आणि त्या मोठमोठ्या आकड्यांच्या संख्येवरूनच तितकाच मोठा सट्टाही खेळला जातो. कारण आयपीएल सामन्यांचा खर्च हा केवळ तिकीट विक्रीतून किंवा जाहीरातीमधून भरून निघू शकत नाही. त्यासाठी अशा सट्टेबाजीचाच आधार घेतला जात असावा. गुंतवलेला पैसा साधारणपणे पाच वर्षांत दुप्पट होतो. परंतु इथे हा पैसा केवळ वर्षभरामध्ये पाचपट करण्याचा उद्योग राजकारण्यांनी आणि अभिनेत्यांनी सुरू केला. त्याला सट्ट्याचाच पाठिंबा मिळाला. नाहीतर शाहरूख खानला, शिल्पा शेट्टीला किंवा प्रीती झिंटाला क्रिकेटसारख्या अनोळखी क्षेत्रात घुसखोरी करण्याची काही गरज पडली नसती. पैशासाठी क्रिकेटचा अक्षरशः तमाशा केला गेला आहे. आणि आयपीएलने क्रिकेटच्या प्रतिष्ठेला कायमचे गालबोट लावले आहे. ते यापुढे होऊ द्यायचे नसेल तर आयपीएलची कार्यपध्दती सुधारली पाहिजे. सट्टेबाज आणि दलालांच्या तावडीत सापडलेला हा खेळ बाहेर काढला पाहिजे, अन्यथा आयपीएल हा प्रकार कायमचा बंद केला पाहिजे, लोकांना क्रिकेटमधला निर्भेळ आनंद हवा आहे, तो टिकवून ठेवण्याची जबाबदारी संबंधितांनी पार पाडलीच पाहिजे.